# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१
०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० फॅकस ०२२ २२०१८५३९ E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

---

जा.क्र.राआ/महा./ २०२०/कोरोना/कामकाज परिपत्रक दिनांकः- ३१-०३-२०२०

## परिपत्रक

**संदर्भः- १. राज्य आयोग परिपत्रक क्र. राआ/महा/PRO/२०२०/१३३३ दि. १६.०३.२०२०**
**२. केंद्र शासनाची अधिसुचना क्र. ४०-३/२०२०-DM-१(A) दि. २३.०३.२०२०**
**३. राज्य शासनानाची अधिसुचना क्र. DMU/२०२०/२०२०/CR.९२/DisM-I, दि. २५.०३.२०२०**

महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणूचा प्रसार दररोज वाढत असल्यामुळे वरील संदर्भिय क्र. १ अन्वये राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व महाराष्ट्रातील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचामध्ये केवळ तात्काळ सुनावणी घेणे आवश्यक असलेल्या प्रकरणांचीच (Urgen Matters Only) सुनावणी घेण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच दि. ३१.०३.२०२० रोजीपर्यंत सुनावणी करीता ठेवण्यात आलेल्या प्रकरणांना तारखा देण्यात येणार असल्याचे सुचित करण्यात आलेले आहे.

तथापि केंद्र शासनाकडून वरील संदर्भिय क्र. २ अन्वये व राज्य शासनाकडून वरील संदर्भिय क्र. ३ अन्वये दि. १४.०४.२०२० पर्यंत पुर्ण देशात तसेच राज्यात लॉकडाऊन करण्यात आलेले आहे. वरील संदर्भिय क्र. ३ मधील अधिसुचनेमध्ये पृष्ठ क्र. २ वरील मुद्दा क्र. २ मध्ये नमुद करण्यात आलेल्या कार्यालयांखेरीज इतर सर्व कार्यालये बंद ठेवण्याबाबत राज्य शासनाकडून आदेशित करण्यात आले आहे.

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगास ग्राहक संरक्षण अधिनियम कलम २४(ब) द्वारे प्राप्त अधिकारानुसार सदर परिपत्रकाद्वारे सर्व वकीलवर्ग, पक्षकार तसेच सर्व संबधितांना कळविण्यात येते की, दि. १४.०४.२०२० रोजीपर्यंत राज्य आयोगाचे मुंबई कार्यालय, नागपूर व औरंगाबाद येथील कार्यालये व राज्यातील सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच कार्यालये बंद राहतील. तसेच केंद्र शासनाकडून किंवा राज्य शासनाकडून वरील लॉकडाऊन कालावधी वाढवण्यात आल्यास तोपर्यंत या परिपत्रकातील आदेश लागू राहतील.

राज्य आयोग मुंबई पीठाकडून तात्काळ आदेश पारित करणे आवश्यक असलेल्या प्रकरणांमधील ( उदा. जामीन, न्यायालयीन बंदी, स्थगिती आदेश ) संबधित पक्षकारांनी प्रकरण सुनावणी करीता घेण्यासाठी राज्य आयोगाचे शिरस्तेदार श्री. भुषण पंचभाई ( मोबाईल क्र.९०११०६६१५० ) व श्री. जितेंद्र ठाकूर ( मोबाईल क्र. ९४२०३७३०४०) यांच्याशी संपर्क साधावा. संबधित शिरस्तेदार प्रबंधक विधी यांच्यामार्फत प्रकरण सुनावणीकरीता अध्यक्ष, राज्य आयोग यांचे समोर ठेवतील. सदर प्रकरणांमध्ये मा. अध्यक्ष राज्य आयोग यांना आवश्यक वाटल्यास सुनावणी त्यांच्या निवासस्थानी अथवा कार्यालयामध्ये घेतील. राज्य

ग्राहक तक्रार निवारण आयोगाची परिक्रमा खंडपीठे तसेच राज्यातील सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच कार्यालयांनी देखील अत्यावश्यक प्रकरणांकरीता वरीलप्रमाणे नियोजन करावे.

Sd/-
**(न्या. अ. पी. भंगाळे)**
अध्यक्ष,
राज्य ग्राहक तक्रार निवारण
आयोग,महाराष्ट्र मुंबई.

प्रतः-

१. मा. न्यायिक सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई /औरंगाबाद/नागपूर
२. मा. सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई /औरंगाबाद/नागपूर
३. मा. अध्यक्ष, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
४. मा. सदस्य, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
५. प्रबंधक विधी, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, औरंगाबाद/नागपूर
६. प्रबंधक प्रशासन, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई
७. प्रबंधक, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
८. ॲडव्होकेट बार असोसिएशन, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई /औरंगाबाद/नागपूर
९. ॲडव्होकेट बार असोसिएशन, सर्व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच
१०. राज्य आयोगाच्या मुंबई कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी प्रबंधक प्रशासन किंवा प्रबंधक विधी यांच्या संपर्कात रहावे. तसेच आवश्यकता असल्यास कार्यालयात उपस्थित रहाण्याबाबत आदेशित करण्यात आल्यास कार्यालयात उपस्थित रहावे .